**- प्रेस नोट -**

# पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनी ॲपद्वारे गांव नमुना-12 मध्ये शेतक-यांनी स्वत: नोंदविण्याचा पथदर्शी प्रकल्प अचलपूर तालुक्यात मंजुर

**तहसिल अचलपूर :-**

महाराष्ट्र शासन व टाटा ट्रस्ट च्या सौजन्याने पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनी द्वारे (ॲन्ड्रॉईड मोबाईल द्वारे) गांव नमुना-12 मध्ये स्वत: शेतक-यांनी पीक पेरा नोंदविण्याबाबत महाराष्ट्र राज्यातून सहा तालुक्यांची निवड करण्यात आली त्यापैकी अमरावती विभागातून अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्याची निवड करण्यात आलेली आहे. सदर योजना राबविण्याच्या दृष्टीने राज्याचे माजी मुख्य सचिव मा.डॉ.जयंतकुमार बांठीया यांच्या मार्गदर्शनाखाली ई-पीक पाहणी प्रकल्प राबविण्याबाबत मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी दिनांक 10 मे, 2018 रोजी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय महसुल व वन विभाग दिनांक 10 सप्टेंबर, 2018 निर्गत झालेला आहे.

या मोबाईल ॲपद्वारे शेतक-यांच्या सहभागाने आपल्या शेतातील पीक पेरणीबाबतचा, पीक वाढीच्या विविध अवस्थांचा व पीक कापणी पुर्वीच्या अवस्थांचा फोटो अपलोड करण्याची विशेष सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. यामुळे नैसर्गिक आपत्ती/विविध प्रकारचा प्रादुर्भाव याबाबतच्या नुकसानीचा सुध्दा फोटो अपलोड करण्याची सुविधा प्रदान करण्यात आलेली आहे. या सुविधेमुळे पीक अहवाल प्रक्रियेमध्ये शेतक-यांचा सक्रिय सहभाग, अचुक व विश्वसनिय माहिती, शासकिय अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाचा बोजा कमी, पीक विमा योजना, कर्ज पुरवठा इ. कामी मदत घेतल्या जाऊ शकते. पीकांच्या आपत्तीमुळे नुकसान भरपाई, शेतक-यांना हवामान, किडीचा प्रादुर्भाव, इतर रोगांच्या उपचारासाठी शेतक-यांना तातडीने संदेश देणे, याबाबीची सुलभता निर्माण होणार आहे.

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता कृषी विभाग, ग्राम विकास विभाग व महसुल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतक-यांना प्रशिक्षण व या मोबाईल ॲप ची माहिती देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाकरिता "शेतीमित्र" यांचा सुध्दा सहभाग या प्रशिक्षणामध्ये "प्रशिक्षक" म्हणून घेतला जाईल. सदर योजनेचे शेतक-यांना प्रशिक्षण व प्रभावी अंमलबजावणी करुन माहे फेब्रुवारी, 2019 पर्यंत कार्यवाही पुर्ण करण्यावावत शासनाचे निर्देश आहेत.

शासनाच्या या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करिता दिनांक 05/02/2019 रोजी अचलपूर येथे याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सदर प्रशिक्षणास माजी विभागीय आयुक्त श्री.एन.आरुमूगम, से.नि.उपजिल्हाधिकारी श्री.मोहन पातुरकर, से.नि.विभागीय कृषी सहसंचालक श्री.अशोक लोखंडे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री.जी.टी.देशमुख, तहसिलदार अचलपूर श्री.निर्भय जैन, गटविकास अधिकारी श्री.बावरे, तालुका कृषी अधिकारी श्री.प्रफुल्ल सातव, टाटा ट्रस्ट चे तांत्रिक सहाय्यक श्री.नाईक, जिल्हा शेतकरी सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री.अरविंद नळकांडे, कार्ड संस्थेचे अध्यक्ष श्री.लाडोळे इत्यादींनी प्रशिक्षणास उपस्थित शेतकरी, मंडळ अधिकारी महसुल व कृषी, कृषी सहाय्यक, ग्राम सचिव, तलाठी यांना मार्गदर्शन केले. सदर प्रकल्पांतर्गत शेतक-यांनी आपल्या किंवा इतरांच्या ॲन्ड्रॉईड मोबाईल वरुन ई-पीकपाहणी (Epeek pahni) या मावाईल ॲपवर नोंदणी करायची असून स्वत:चा मोबाईल क्रमांक परिचयाचा तपशील नोंदवायचा आहे व रजिस्टर मोबाईल क्रमांकावर आलेल्या संकेतांक क्रमांकाचा वापर करुन आवश्यक माहिती भरायची आहे. तसेच, स्वत:चे शेतातील रब्बी हंगामात लागवड केलेल्या पिकाचा फोटो अपलोड करायचा आहे. यावरुनच तलाठी हे सदर शेतक-याच्या गांव नमुना-12 मध्ये रब्बी पिक पे-याची नोंद पडताळणी करुन अंतीम करणार आहेत. यामुळे आता तलाठी/कृषीसहाय्यक यांना शेतक-यांच्या शेतावर जावून पिकपाहणी करण्याची गरज आता या प्रकल्पाअंतर्गत राहिलेली नसून शेतकरी स्वत:च आपला रब्बी पिकपेरा या मोबाईल ॲपच्या मदतीने भरणार आहे. याबावत काही शंका/अडचणी असल्यास सबंधित शेतक-यांनी आपले तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, तहसिल कार्यालय, तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, पंचायत समिती तसेच महा ई-सेवा केंद्र येथे संपर्क साधावा व शासनाच्या या स्तुत्य उपक्रमाचा जास्तीत जास्त शेतक-यांनी लाभ घेण्याचे याद्वारे आव्हान जिल्हा व तालुका प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

**दिनांक :- 05/02/2019**

तहसिलदार
अचलपूर

6/2/19

**तहसिलदार, अचलपूर करिता**

Scanned by CamScanner